१३ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिला
यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २२ जुलै, २०२२

निवडणूक प्राथम्य

प्रति,
आयुक्त,
नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली,
कोल्हापूर, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, अमरावती, अकोला, व नागपूर महानगरपालिका.

विषय :- १३ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिला यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र. २१ /का.५
दि. २२ जुलै, २०२२ चे आदेश.

महोदय,

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन, जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत, अशी तरतूद दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशामध्ये केली होती.

आणि ज्याअर्थी, त्यास अनुसरुन नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अमरावती, अकोला व नागपूर या १३ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता आरक्षण सोडत दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आली. त्यानुसार आरक्षित जागांबाबत हरकती व सूचना मागविण्यात आल्या व त्याचा विचार करुन अनुसूचित जाती, अनुसूचित जाती (महिला) अनुसूचित जमाती, अनुसूचित

जमाती (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण दर्शविणारी अधिसूचना दि. १३ जून, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन आदेशान्वये महानगरपालिकांच्या सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण याबाबतचे दि. २८ डिसेंबर, २०२१ चे आदेश सुधारीत केले आहेत. त्यास अनुसरुन आता समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात मात्र एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्यावर जाणार नाही या मर्यादेत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवावयाच्या आहेत.

आणि ज्याअर्थी, वरील सुधारणेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जाती (महिला) अनुसूचित जमाती, अनुसूचित जमाती (महिला) यांच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल होत नाही. मात्र सर्वसाधारण महिलांची सोडत रद्द करुन नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांची सोडत नव्याने काढणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अमरावती, अकोला व नागपूर या १३ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्या आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता आरक्षण सोडत काढण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

१. अनुसूचित जाती, अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती व अनुसूचित जमाती (महिला) यांचे आरक्षण हे लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने होत असल्याने व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवल्यामुळे या आरक्षणात कोणताही बदल होत नसल्यामुळे सदर आरक्षण दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार राहील.

२. दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेले सर्वसाधारण महिलांचे आरक्षण याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

३. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

४. सोडत व आरक्षणावर हरकती व सूचना मागविणे याकरिता नेमून दिलेल्या दिनांकास सोबतच्या परिशिष्ट-ड (मराठी) व परिशिष्ट- इ (इंग्रजी) मधील नमुन्यात जाहीर सूचना प्रसिध्द करावी.

५. शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या नियमानुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्या आरक्षण निश्चितीबाबत कार्यवाही करावयाची आहे.

६. सदर कार्यक्रमानुसार सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षण हरकती व सूचना मागविण्याकरिता सोबतच्या **परिशिष्ट-ब** नुसार प्रसिध्द करावे.

७. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिशिष्ट- १२ नुसार सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार सोडत काढण्याकरिता योग्य ती उपाययोजना संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

८. वरील सूचनांनुसार प्रभागांमधील आरक्षित जागा निश्चित करुन सोडतीचा निकाल विहित नमुन्यांमध्ये राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविण्यात यावा.

९. सोडतीनंतर सोडतीचा निकाल महानगरपालिकेची वेबसाईट, सूचना फलक व वर्तमानपत्र इ. ठिकाणी प्रसिध्द करावा.

१०. सोडत काढून त्याची प्रसिध्दी करणे व विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिमरित्या अधिसूचित करण्याचे अधिकार याद्वारे संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यानुसार त्यांनी सोबतच्या

परिशिष्ट-क मधील अधिसूचनेच्या नमुन्यात प्रभागनिहाय आरक्षण अंतिमरित्या प्रसिध्द करावे.

वरील कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. तसेच सोडतीची सूचना, सोडतीचा निकाल आणि अंतिम आरक्षण अधिसूचना इ. महानगरपालिकेच्या संकेतस्थळ व सूचना फलक इ. ठिकाणी वेळोवेळी प्रदर्शित करुन त्याची योग्य ती प्रसिध्दी करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट-अ

या कार्यालयाचे क्र.रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५, दि. २२ जुलै, २०२२ सोबतचे सहपत्र.

**नवी मुंबई, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अमरावती, अकोला व नागपूर या**

**१३ महानगरपालिकांचा आरक्षण व सोडत कार्यक्रम-२०२२**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडत काढण्यासाठी- **सोबतच्या परिशिष्ट-ड (मराठी) व परिशिष्ट-इ (इंग्रजी)मधील नमुन्यात जाहीर नोटीस प्रसिध्द करणे.** (त्याची स्थानिक वर्तमानपत्र, वेबसाईट, सूचना फलक इ. वर प्रसिध्दी द्यावी.) | २६/०७/२०२२ (मंगळवार) |
| २ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता - **सोडत काढणे** | २९/०७/२०२२ (शुक्रवार) |
| ३ | सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे. **(परिशिष्ट-ब मधील नमुन्यात)** (त्याची स्थानिक वर्तमानपत्र, वेबसाईट, सूचना फलक इ. वर प्रसिध्दी द्यावी.) | ३०/०७/२०२२ (शनिवार) |
| ४ | प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ३०/०७/२०२२ (शनिवार) ते ०२/०८/२०२२ (मंगळवार) |
| ५ | आरक्षण निश्चितीबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर विचार करुन **प्रभागनिहाय अंतिम आरक्षण सोबतच्या परिशिष्ट-क मधील नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे** | ०५/०८/२०२२ (शुक्रवार) |

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट-ब

या कार्यालयाचे क्र.रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.२६/का.५, दि. २२ जुलै, २०२२ सोबतचे सहपत्र.

## ---------------- महानगरपालिका प्रारुप / अंतिम प्रभागनिहाय आरक्षण.

------ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२२ करिता क्रमांक ---------- दि. --------- अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

### एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | **एकूण** | | |

### प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | |
| २ | | १-ब | |
| ३ | | १-क | |
| ४ | २ | २-अ | |
| ५ | | २-ब | |
| ६ | | २-क | |
| याप्रमाणे... | | | |

वरील आरक्षणासंदर्भात कोणत्याही हरकती व सूचना असल्यास त्या दि. -------- ते ---------- या कालावधीत सादर कराव्यात.

महानगरपालिका आयुक्त
----------- महानगरपालिका.

टीप- १) अनुसूचित जाती (महिला) व अनुसूचित जमाती (महिला) यांचे आरक्षण दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार आहे.

२) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण दि. ------- रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार आहे.

# परिशिष्ट- क

## अधिसूचना

क्रमांक .................. ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने दि. १० मे, २०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार ......... महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभागांच्या अंतिम भौगोलिक सीमा क्र. ................, दि. .......... च्या अधिसूचनेअन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. ......... दि. ....... च्या पत्रान्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणास मान्यता दिली आणि त्यानुसार दि. ३१ मे, २०२२ रोजी अनूसूचित जाती (महिला) व अनुसूचित जमाती (महिला) यांची सोडत काढण्यात आली.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र. ........... दि. ............ च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या निर्देशास अनुसरुन नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा आरक्षित करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन सर्वसाधारण महिलांची दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेली सोडत व त्यानुसार जाहीर करण्यात आलेले आरक्षण रद्द करण्यात आले असून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्या आरक्षणाची सोडत काढून त्याची अंतिमरित्या प्रसिध्दी करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान केले आहेत. सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार ......... महानगरपालिकेच्या आरक्षित प्रभागांची जाहीर सोडत दि. ....... रोजी काढण्यात आली व प्रभागनिहाय एकत्रित आरक्षण (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसह) प्रसिध्द करुन त्यावर दि. ....... ते ......... या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या.

आणि त्याअर्थी; मी ...............आयुक्त, ........... महानगरपालिका यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र. .................. दि. ........... अन्वये ............ महानगरपालिकेच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या निवडणूक प्रभागांमध्ये पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ यापूर्वी यासंदर्भात काढलेल्या आदेशात सुधारणा करुन खालीलप्रमाणे एकत्रित आरक्षण अधिसूचित करीत आहे :-

### एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | | |
| ४ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

## प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशील.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | |
| २ | | १-ब | |
| ३ | | १-क | |
| ४ | २ | २-अ | |
| ५ | | २-ब | |
| ६ | | २-क | |
| याप्रमाणे... | | | |

ठिकाण

दिनांक

आयुक्त,

----------- महानगरपालिका.

टीप- १) अनुसूचित जाती (महिला) व अनुसूचित जमाती (महिला) यांचे आरक्षण दि. ३१ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार आहे.

२) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण दि. ------- रोजी काढण्यात आलेल्या सोडतीनुसार आहे.

## परिशिष्ट - ड

## (सोडत व आरक्षण प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)

### महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -------

जाहीर सूचना

---------- महानगरपालिकेच्या सन ---- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | आरक्षणाबाबत हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| | | |

ठिकाण :-------------

आयुक्त,

दिनांक :-------------

--------महानगरपालिका

परिशिष्ट - इ

(सोडत व आरक्षण प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)

## ---------------------- MUNICIPAL CORPORATION

## GENERAL ELECTION ------------- (Year)

**PUBLIC NOTICE**

**For the General Election of ---------------------- Municipal Corporation to be held in the year ----------,The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Backward Class of Citizen, Backward Class of Citizen (women) & General Women and for the publication of reservation is as below.**

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Date -----------<br>At --------- a.m<br>Place ----------------------<br>----------------------<br>---------------------- |
| 2 | Date of publishing the draft of reservation | --------day, Date – -------------- |
| 3 | Last date of submitting Objections & Suggestions on reservation (To be submitted to The Municipal Commissioner for Objections & Suggestion, in Election Office or concerned ward Office) | ----------day, Date----------------<br>to<br>----------day,Date-----------------<br>(upto 3.00 p.m.) |

**Place :-** **Commissioner,**

**Date :** **------------Municipal Corporation**